मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पाचपैकी 3 मतदार संघावर शरद पवार गटाचा दावा!

## शरद पवार गटाच्या पक्षश्रेष्ठींकडे इच्छुकांची मोर्चेबांधणी : पिंपरी-चिंचवडमध्ये प्रस्थापितांना धक्का देण्याची तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून जोरदार मुसंडी मारण्याची तयारी सुरू झाली आहे. पिंपरी, चिंचवड, भोसरी, मावळ आणि भोर-वेल्हा-मुळशी अशा पाचपैकी ३ मतदार संघात 'तुतारी' वाजवण्यासाठी स्वत: शरद पवार मैदानात उतरणार आहेत. तसेच उर्वरित दोन जागा महाविकास आघाडीतील मित्र पक्षाला देण्यात येतील, असे चित्र आहे.



लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून वाट्याला आलेल्या १० पैकी ८ जागा शरद पवार गटाने जिंकल्या आहेत. त्यामुळे अजित पवार गटाची पिछेहाट झाली. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवार यांनी सौभाग्यवती सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर बिनविरोध निवडून आणत जिल्ह्यात पक्षाचे वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र, अजित पवार यांच्या वर्चस्वाला विधानसभेत सुरंग लावण्याची रणनिती शरद पवार गटाकडून सुरू झाली आहे.

पुण्यातील ८ पैकी ६ जागांवर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उमेदवार लढवतील, असा दावा पुण्याचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केला. त्याआधी सांगली जिल्ह्यातील सहापैकी ५ जागा शरद पवार गट लढवाणार, असा दावा प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. त्यानंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये शरद पवार गटातील स्थानिक नेत्यांकडून उमेदवारीवर 'क्लेम' केला जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड, आणि भोसरी या तीनही मतदार संघामध्ये अजित पवार गटाच्या स्थानिक इच्छुकांनी दावा केला आहे. अजित पवार यांचे वर्चस्व असलेल्या शहरात शरद पवार गटाकडून तीनही जागा लढवण्याची तयारी आहे. शिरूर लोकसभा मतदार संघातील खासदार अमोल कोल्हे यांचा प्रचंड प्रभाव असलेला भोसरी मतदार संघ 'तुतारी'वरच लढवणार, असा डॉ. कोल्हे यांचा निर्धार आहे.

पिंपरी विधानसभा मतदार संघात अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या विरोधात शरद पवार गटाकडून उमेदवार देणार हे निश्चित आहे. तसेच, चिंचवडमधून शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे इच्छुक असल्याचे त्यांनी स्वत: जाहीर केले आहे. त्यामुळे शहरातील तीनही मतदार संघांवर 'तुतारी'चे गारुड पहायला मिळणार आहे.

### मावळात मशाल अन् मुळशीत हात..!

**» दुसरीकडे, मावळमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाची ताकद मोठी आहे. कारण, लोकसभा निवडणुकीत मावळ विधानसभा मतदार संघामध्ये अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके आणि भाजपाचे माजी मंत्री बाळा भेगडे सोबत असतानाही शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना अपेक्षीत मताधिक्य मिळालेले नाही. या मतदार संघातून ठाकरे गटाची 'मशाल' मैदानात उतरवण्याची तयारी सुरू आहे. तसेच, भोर- वेल्हा- मुळशी या विधानसभा मतदार संघात पिंपरी-चिंचवडला जोडून असलेल्या हिंजवडी, ताथवडे, वाकड, पुनावळे, जांबे, नेरे आदी भागांमध्ये खासदार सुप्रिया सुळे यांना मिळालेली मते निर्णायक आहेत. तसेच, विद्यमान आमदार म्हणून काँग्रेसचे संग्राम थोपटे यांचा या जागेवर 'क्लेम' राहणार आहे.**

> राज्यात शरद पवार यांच्या विचारांचे वादळ सुरू झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहर हे जुन्या बारामती लोकसभा मतदार संघात होते. शहराचे नेतृत्व शरद पवार यांनीच केले. पिंपरी-चिंचवडकरांच्या घराघरांत शरद पवारांच्या विकासाचा अजेंडा पोहोचलेला आहे. शरद पवार यांची जादू चालली आणि लोकसभा निवडणुकीत महायुतीचे मताधिक्य घटले, ही वस्तुस्थिती आहे. आमच्या पक्षाकडे भोसरी, चिंचवड आणि पिंपरी या तीनही मतदार संघात तगडे उमेदवार आहेत. महाविकास आघाडीचे पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आम्हास शीरसावंद्य आहे.
>
> **- तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष.**

# कल्याणीनगर अपघात प्रकरणाची आळंदीत पुनरावृत्ती

## भांडणाचा राग धरून अल्पवयीन कार चालकाकडून महिलेस चिरडण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या महिनाभरापासून चर्चेत असलेल्या पुण्यातील कल्याणीनगर येथील पोर्शे कार प्रकरणाची पुनरावृत्ती आळंदीजवळील वडगाव घेनंद येथे घडल्याची समोर आले आहे. मोटार वेगात चालवू नकोस असे सांगितल्याने झालेल्या वादातून १७ वर्षीय मुलाने भरधाव मोटार महिलेच्या अंगावर घातली. यात महिला जखमी झाली आहे.



याबाबत नाजुका रणजीत थोरात (वय २४, रा. गणेशनगर, वडगाव घेनंद) यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला.

थोरात आणि अल्पवयीन मुलगा शेजारी रहायला आहेत. मुलगा मोटार वेगात चालवत होता. त्यावरून थोरात यांनी मोटार वेगात चालवू नकोस, असे सांगितले होते. त्यातून त्यांच्यात वाद झाला होता. त्याचा राग मनात धरून मुलाने मोटार भरधाव वेगात चालविली. 'थांब तुला गाडी खाली चिरडून जीवे ठार मारतो' असे म्हणत रस्त्यावर थांबलेल्या थोरात यांच्या अंगावर भरधाव मोटार घातली. त्यात त्या जखमी झाल्या. तसेच थोरात आणि त्यांच्या पतीला 'तुला संपवतो' असे म्हणत जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

# पुरंदर विमानतळ मूळ जागेवरच होणार

## केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ याचे प्रतिपादन

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. हे विमानतळ होणार की नाही यावरून अनेकदा चर्चा झाली आहे. या विषयावर आता थेट नवनियुक्त केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी स्पष्ट वक्तव्य केले आहे. पुरंदरमधील प्रस्तावित विमानतळ मूळ जागेवरच होणार असून त्याला नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाची मान्यता मिळाल्याची माहिती मोहोळ यांनी दिली. येत्या काही दिवसांतच याविषयी नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्यासह सर्व यंत्रणांची बैठक होणार आहे. याविषयी एकत्रितपणे जागेची पाहणी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विमानतळाच्या भूसंपादनाची प्रक्रियाही सुरू होणार असल्याचे ते म्हणाले.



पुणे दौऱ्यावर आलेल्या मोहोळ यांनी पुणे विमानतळावर रविवारी याविषयी आढावा बैठक घेतली. या संदर्भात ते म्हणाले की, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाकडे पुरंदर विमानतळासंदर्भातील प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने २०१८ मध्ये पाठवला होता. पुरंदर विमानतळासाठी '१ ए' ही जागा महायुती सरकारच्या काळात ठरविण्यात आली होती. त्यावेळी विमानतळाचा प्रस्ताव मंजूरही झाला होता. मात्र, २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारने जागा बदलली. ही जागा '५ ए' अशी करण्यात आली. त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे हा प्रस्ताव रखडल्याचे मोहोळ म्हणाले. त्यानंतर महायुती सरकारने २०२३ मध्ये पुन्हा मूळ जागेचा प्रस्ताव पाठविला. आता या प्रस्तावानुसार मूळ जागीच विमानतळ उभारण्यास नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने मंजुरी दिल्याचे मोहोळ म्हणाले.

पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करायचा आहे. पुणे विमानतळाकरिता ३५ एकर जागा संपादित करायची आहे. लवकरात लवकर भूसंपादन करायचं आहे आणि त्याचा मोबदला शेतकऱ्याला दिला जाणार आहे. मोबदल्यातील ६० टक्के मोबदला सरकार देणार आहे. राजनाथ सिंह यांच्याशी या विषयावर बोलणार असल्याचेही मोहोळ म्हणाले. एअर इंडियाचे एक विमान अपघातग्रस्त झालं असून त्याची पाहणी केली आहे. 'डिफेन्स'च्या जागेमध्ये हे विमान हलविण्याकरिता संरक्षण मंत्रालयाला पत्र देण्यात आले आहे. यासोबतच, नवी मुंबई विमानतळाचे काम ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित ३० टक्के काम मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होईल असे ते म्हणाले.

### नवीन टर्मिनल लवकरच सेवेत

» लोहगाव विमानतळाचे नवीन टर्मिनल लवकरच सुरू केले जाणार असल्याची माहिती मोहोळ यांनी दिली. या नवीन टर्मिनलसाठी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ) अतिरिक्त मनुष्यबळ लागणार असून हे मनुष्यबळ पुरविण्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना विनंती करण्यात आली आहे. शहा यांनी याविषयी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे मोहोळ म्हणाले. अतिरिक्त मनुष्यबळ मिळाल्यानंतर नवीन टर्मिनल लवकरच सुरू होईल, असे त्यांनी सांगितले.

# वारीची भव्यता, सार्वजनिक आरोग्य विभागाची सज्जता

## आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी : 1 हजार 743 वारकऱ्यांना आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य सेवा

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या भेटीसाठी राज्यात पालखी सोहळा सुरू झाला असून १३ जूनला श्री संत गजानन महाराज मंदिर 'श्री'च्या पालखीने शेगाव, बुलढाणा जिल्ह्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले आहे. 'आरोग्याची वारी-पंढरीच्या दारी' या उपक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण पालखी मार्गावर आतापर्यंत (१४ जून) एकूण १ हजार ७४३ वारकऱ्यांना आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य सेवा देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, देहू-आळंदी ते पंढरपुर तसेच महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या हजारो पालख्या, दिंड्या मार्गावर आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहे.



### एमएसईबीला देणार नोटीस

» आरोग्य विभागाकडून एकूण ६ हजार ३६८ अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत महाराष्ट्रातील विविध पालखी मार्गावर आवश्यकतेनुसार वारकऱ्यांची मोफत तपासणी व औषधोपचार करुन आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

» २५८ तात्पुरत्या 'आपला दवाखान्या'च्या माध्यमातून (प्रत्येकी पाच किलोमीटर अंतरावर १ याप्रमाणे) मोफत सेवा पुरविण्यात येत आहे.

» ७०७ (१०२ व १०८) रुग्णवाहिकांमार्फत पालखी मार्गावर २४x७ पद्धतीने आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे.

» पुणे परिमंडळ पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन ४ आरोग्य पथके सुसज्ज रुग्णवाहिकेसह अविरत पालखी परतेपर्यंत सोबत राहणार आहेत.

» २१२ आरोग्यदुतांमार्फत (बाईक ॲम्बुलन्स) पालखी मार्गावर आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

» ५ हजार ८८५ औषधी किटचे विविध दिंडी प्रमुखांना मोफत वाटप करण्यात येणार आहे.

» १३६ हिरकणी कक्षांची स्थापना पालखी मार्गावरील आरोग्य संस्थेच्या ठिकाणी तसेच पालखी तळावर करण्यात आलेली आहे.

» महिला वारकऱ्यांसाठी १३६ स्त्रीरोग तज्ज्ञ पालखी मार्गावरील रुग्णालयामध्ये कार्यरत असतील.

» पालखी मुक्कामच्या प्रत्येक ठिकाणी ५ बेडची क्षमता असलेले ८७ अतिदक्षता विभाग उभारण्यात आलेले आहेत.

» पालखी मार्गावरील सर्व हॉटेल्स व त्याअंतर्गत असलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी करण्यात येत असून, पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणच्या किचनची देखील तपासणी करण्यात येणार आहे.

» पालखी मार्गावर १५६ टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येणार असून पालखी मार्ग व मुक्कामाच्या ठिकाणी धूर फवारणी, पाण्याच्या सर्व स्रोतांचे ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थांमार्फत जैव कचरा विल्हेवाट करण्यात येत आहे.

» पालखी मार्गावर आरोग्य विषयक जनजागृती करण्यात येणार आहे.

# त्वरा करा..! कर सवलतींचे उरले 12 दिवस

## कॅश काउंटर सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू : जास्तीत जास्त मालमत्ता धारकांनी लाभ घेण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत मुदत आहे. त्यामुळे शेवटचे फक्त 12 दिवस बाकी असून कॅश काउंटर उद्या (दि.18) जूनपासून सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. कर सवलतींचा जास्तीत-जास्त मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सिध्दी उपक्रमा अंतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ता धारकांना बिलांचे वेळेत वाटप करण्यात आले आहे. त्यामुळेच 2024-25 या आर्थिक वर्षातील अडीच महिन्यांत 3 लाख 9 हजार 233 मालमत्ता धारकांनी 362 कोटी 12 लाख रुपयांचा महसूल महापालिका तिजोरीत जमा केल्याची माहिती कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.

कर संकलन विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांना विविध कर सवलती देण्यात येत असून या सवलतींची 30 जून मुदत आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कर भरण्याकडे मालमत्ता धारकांचा कल असतो. महापालिकेच्या वतीने कर संकलनासाठी 17 झोन आहेत. तसेच ऑनलाईनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, अनेक नागरिक रोखीने कर भरत आहेत. त्यामुळे कर संकलन कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांची मोठी गर्दीही होत आहे. महापालिकेने सकाळी पावणेदहा ते सायंकाळी 6 या वेळेत कॅश काउंटर सुरू ठेवण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी 30 जूनपर्यंत जास्तीत-जास्त मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा करावा, असे आवाहन सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळ्या जमीन, मिश्र अशा ६ लाख २८ हजार मालमत्ता आहेत. नागरिकांना मालमत्ताकराचा घरबसल्या भरणा करता यावा, यासह सर्व सेवा सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ३० जूनपर्यंत कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.




### अडीच महिन्यातच पन्नास टक्के मालमत्ता धारकांनी भरला कर

» शहरातील मालमत्ता धारकांनी वेळेवर कर भरावा, यासाठी महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. कर थकीत ठेवल्यास त्यावर दंडाची रक्कम वाढतच जाते, त्यामुळे वेळेत कर भरणे कधीही मालमत्ता धारकांच्या हिताचेच असल्याचे पटवून देण्यात महापालिका प्रशासन यशस्वी झाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या पहिल्या अडीच महिन्यात 6 लाख 28 हजार मालमत्ता धारकांपैकी 3 लाख 9 हजार 233 मालमत्ता धारकांनी आपला कर भरणा केला आहे.

> मालमत्ताधारकांनी ३० जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल २० टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतींचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा. त्यानंतर लागणारे महिना दोन टक्के विलंब शुल्क टाळण्यासाठी नागरिकांनी आगाऊ कराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

> गतवर्षी २०२३-२०२४ च्या पहिल्या तिमाहीत पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मालमत्ताधारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत तब्बल ४४७ कोटी रुपयांचा कर भरणा केला होता. यंदाही दीड महिन्यात १ लाख ८१ हजार ९६८ जणांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत कर भरला आहे.
>
> - नीलेश देशमुख, साहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग

---

# “गेले ते कावळे, राहिले ते मावळे” डॉ. कोल्हेंचा गर्भीत इशारा!

## विधानसभा निवडणुकीत निष्ठावंत उमेदवारालाच संधी देणार : महायुतीतून महाविकास आघाडीत प्रवेशाची दारे बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत कुणी-कसे- कधी आणि कुठे काय-काय केले याचा सर्व रिपोर्ट माझ्याकडे आहे. त्यामुळे कुणीही कितीही काव- काव केली, तरी विधानसभा निवडणुकीत निष्ठावंत उमेदवाराला संधी मिळेल. गेले ते कावळे आणि राहिले ते मावळे अशी आमची भूमिका आहे. काठावर बसलेल्या कावळ्यांना संधी नाही. त्यामुळे हा मतदार संघ कुणाला सोडणार? काय करणार? यापेक्षा भोसरीचा आमदार महाविकास आघाडीचा होईल, असा दावा शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केला आहे.

शिरुर लोकसभा निवडणुकीत विजय मिळवल्याबद्दल खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा मोशी येथे महाविकास आघाडीच्या माध्यमातून जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या संघटिका सुलभा उबाळे, विधानसभा निवडणूक प्रमुख धनंजय आल्हाट, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी खासदार अमोल कोल्हे यांनी निवडणुकीतील विजयाबाबत महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले. महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेने दिल्लीला दाखवून दिले, की आम्ही दिल्लीसमोर झुकणारे नाही, तर दिल्लीश्वरांसमोर छाती काढून उभा राहणारे आहेत, असा घणाघातही डॉ. कोल्हे यांनी केला.



### उबाळे की आल्हाट उत्सुकता शिगेला... लांडेंची अस्वस्थता..!

» भोसरी विधानसभा मतदार संघ शिवसेना ठाकरे गटाला सोडावा, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केला. तसेच, ‘गेले ते कावळे आणि राहिले ते मावळे’ असा दावा करीत, भोसरीचा आमदार महाविकास आघाडीचा होईल, असा विश्वास खासदार अमोल कोल्हे यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. त्यामुळे महायुतीत तिकीट न मिळाल्यास महाविकास आघाडीचा पर्याय हाती घेण्याची शक्यता असलेले माजी आमदार विलास लांडे यांना ठाकरे गट किंवा शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. परिणामी, लांडे यांची अस्वस्थता वाढली आहे. तसेच, भोसरीतून शिवसेना ठाकरे गटाकडून शहर संघटीका सुलभा उबाळे आणि भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख धनंजय आल्हाट दोघे इच्छुक आहेत. या दोघांपैकी कुणाला संधी मिळणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### आमदार महेश लांडगे यांना टोला...

» लोकसभा निवडणुकीत महायुतीकडे तगडे नेते आणि मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते होते. त्यामुळे आता काय होणार? असे वारंवार वाटत असे. ५ ते १० हजार कमी-अधिक फरकाने निवडणुकीचा निकाल लागेल, असे वाटत असे. महायुतीच्या नेत्यांकडून १ लाखांचे लीड, ५० हजारांचे लीड देणार अशा वल्गना केल्या होत्या. ‘हवा’ निर्माण केली होती. मात्र, मतदारांनी आपल्याला साथ दिली, अशा शब्दांत खासदार कोल्हे यांना आमदार महेश लांडगे यांच्यावर नाव न घेता टोला लगावला.

# ...नाही तर आयती जागा महाविकास आघाडीकडे

## भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांना विधानसभा मतदारसंघात लक्ष घालावे लागणार

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीतील चुका महायुतीने सुधारल्या नाहीत तर, आगामी काळात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्येही लोकसभा निवडणुकी-सारखी परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे पक्षांतर्गत मतभेद महायुतीतील जागावाटप या गोष्टीकडे लक्ष देऊन भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांना अनेक विधानसभा मतदारसंघात लक्ष घालावे लागणार आहे.

महायुतीमध्ये कळीचा मुद्दा असणारा बारामती लोकसभा मतदारसंघातील इंदापूर विधानसभेचा तिला सोडवण्याचे मोठे कठीण आव्हान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या समोर असणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या जागा वाटपात इंदापूरच्या उमेदवारीबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जो निर्णय घेतील. त्यांचा तो निर्णय मान्य असेल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी मान्य केलेले आहे, असे मत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले असून अप्रत्यक्षपणे त्यांनी इंदापूरच्या जागेवर दावा केला आहे.



### विधान परिषद, राज्यसभा तोडगा..

» आमदार दत्तात्रय भरणे तसेच माजी मंत्री राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्यातील वाद मिटवण्यासाठी पक्ष नेतृत्व हे विधान परिषद व राज्यसभेचा तोडगा काढू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. हर्षवर्धन पाटील हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे म्हणून ओळखले जातात तर आमदार दत्तात्रय भरणे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू म्हणून परिचित आहेत. त्यामुळे महायुतीमधील इंदापूरच्या जागेचा वाद शहा, फडणवीस व पवार मिटवतील अशी शक्यता आहे.

महाविकास आघाडीच्या विरोधात लोकसभा निवडणुकीत भाजपाने शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, मनसे आणि इतर छोट्या छोट्या पक्षांना बरोबर घेऊन महायुतीच्या वज्रमुठीची ताकद दाखविली.

### मला राज्य ताब्यात घ्यायचा आहे...

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघाचा दौरा केला. या वेळी इंदापूर तालुक्यामध्ये त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली तेव्हा त्यांनी असं सांगितलं की मला राज्य ताब्यात घ्यायचे आहे. त्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघातील इंदापूरची जागा ही लक्षवेधी ठरणार हे निश्चित आहे.

मात्र निवडणूक पूर्ण होताच ही महायुतीची मूठ सैल झाल्याचे दिसत आहे.

तर इंदापूरमध्ये देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार जो निर्णय घेतील तो आम्हाला आणि हर्षवर्धन पाटील यांना सुद्धा मान्य असेल, असे दत्तात्रय भरणे म्हणाले आहेत. हर्षवर्धन पाटील आणि आम्ही सध्या बरोबर आहोत. आम्ही एकत्र आहोत, मीडियाने आमच्यात उगाच भांडणे लावू नयेत, अशी भूमिका आमदार दत्तात्रय भरणे यांनी घेतली.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत इंदापूर मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना २६ हजार मताचे मताधिक्य इंदापूर तालुक्यातून मिळाले आहे. त्यामुळे इंदापुरात विधानसभेसाठी ही राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून विधानसभेची निवडणूक लढवली जाणार, हे मात्र निश्चित आहे. अशावेळी महायुतीतील वादाकडे पवार यांचे लक्ष असणार आहे.

महायुतीत वाद झाल्यास इंदापूरची लढत तिरंगी होईल व याचा निश्चितच फायदा महाविकास आघाडीला होईल महायुतीसाठी हक्काची समजली जाणारी इंदापूरची जागा अडचणीत येऊ नये यासाठी पक्ष नेतृत्व दोन्ही नेत्यांची समजूत कशी काढणार.? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. लोकसभा निवडणुकीचे मतदान झाल्यानंतर आणि निकालाला एक दिवस बाकी असतानाच महायुतीमध्ये विधानपरिषद निवडणुकीवरून राजकारण पेटले आहे.

# हृदयद्रावक! विजेचा शॉक लागून आई-वडिलांसह मुलाचा मृत्यू

## पुण्यातील दापोडी या ठिकाणाहून एक मन हेलावून टाकणारी दुर्दैवी घटना समोर आली

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील दापोडी या ठिकाणाहून एक मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. यामध्ये आईवडिलांसह मुलाचा विजेचा शॉक लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. सुदैवाने ही दुर्घटना घडली तेव्हा मुलगी घरी नसल्याने ती बचावली आहे. मात्र घटनेमध्ये आईवडिलांसह भावाच दुर्दैवी मृत्यू झाल्याने ती पोरकी झाली आहे. सुरेंद्र देविदास भालेकर (वय 44) त्यांची पत्नी अदिका सुरेंद्र भालेकर (वय 38) व मुलगा प्रसाद सुरेंद्र भालेकर अशी शॉक लागून मृत पावलेल्यांची नावे आहेत. रविवारी सकाळच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली.

भालेकर हे कुटुंब सोलापूर येथील असून सध्या ते दापोडी (ता. दौंड) येथे अडसूळ यांच्या पत्र्याच्या खोलीत राहत होते. सुरेंद्र हे परिसरात बांधकामाची कामे करत होते. मुलगा केडगाव येथील जवाहरलाल विद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिकत होता. तर त्यांची पत्नी गावातील शेतात मजुरीचे काम करायची.

घरा शेजारीच असलेल्या विजेच्या खांबाने त्याला धक्का बसला असावा, अशी नागरिकांच्यात चर्चा आहे. एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींना जीव गमावा लागला. कुटुंबप्रमुखासह दोघांचा जीव गेल्याने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. हे कुटुंब या परिसरात गेल्या पाच वर्षापासून राहत होते. या घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख व विद्युत कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शॉक लागला आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे दापोडी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



### नेमके काय घडले ?

» भालेकर कुटुंब हे गेल्या पाच वर्षापासून दापोडी येथील अडसूळ यांच्या खोल्यांमध्ये राहत होते. या सर्व खोल्या पत्र्यांच्या होत्या. दरम्यान, त्यांच्या खोलीच्या शेजारीच विजेचा खांब आहे. आज सकाळी 7 च्या सुमारास सुरेंद्र हे आंघोळीला गेले होते. यावेळी ते तारेवर टॉवेल टाकत असताना अचानक त्यांना विजेच्या तारेचा जोरदार धक्का बसला. यामुळे ते ओरडले.. दरम्यान, त्यांच्या आवाजाने तत्काळ त्यांना वाचवण्यासाठी मुलगा प्रसाद याने धाव घेतली तर त्यालाही विजेचा धक्का बसला. यादरम्यान सुरेंद्र यांची पत्नी अदिकादेखील त्या ठिकाणी आली त्यांनी पती आणि मुलाला वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने त्यांनादेखील शॉक लागला आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे दापोडी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सुरेंद्र हे परिसरात बांधकामाची कामे करत होते. मुलगा केडगाव येथील जवाहरलाल विद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिकत होता. पत्नी गावातील शेतात मजुरीचे काम करत होती. हे कुटुंब या परिसरात गेल्या पाच वर्षापासून राहत होतं. या हृदयद्रावक घटनेनं दौंड तालुक्यात दुःखाचे सावट पसरले आहे. भालेकरांच्या कुटुंबातील एकमेव मुलगी वैष्णवी (वय १७) कोचिंग क्लासला सकाळीच घराबाहेर पडल्यामुळे तिचा जीव वाचला आहे.